# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 21/02/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

## खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. उमरेड** :– फिर्यादी नामे– राकेश धनराज कुंभरे, वय २१ वर्ष, रा. नवेगाव साधु ता. उमरेड यांच्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन उमरेड येथे अप. क्र. ४७/२०२१ कलम ३०७ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

फिर्यादी व आरोपी नामे– प्रदीप मधुकर कन्नाके, वय २७ वर्ष, रा. नवगाव साधु मा. उमरेड हे तास पत्त्याचा जुगार खेळत होते. जुगार खेळण्याच्या कारणावरून आरोपीचे फिर्यादी सोबत भांडण झाले. भांडणा दरम्या आरोपीने कुऱ्हाडीने फिर्यादीचे डोक्यावर व उजवे खांदयावर व हातावर मारून जखमी करून जिवे मारण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणाचे तपास सहायक पोलीस निरीक्षक एन. डोर्लीकर पोस्टे उमरेड यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक २१/०२/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. पावसकर यांनी वरील नमुद आरोपीला ३०७ भांदवि मध्ये ०५ वर्ष सश्रम कारावास तसेच १०,०००/–रू. दंड, दंड न भरल्यास ०२ वर्ष सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्री. डागोरिया सा. यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोलीस नायक ब. नं. ४८७ माधव काळे यांनी मदत केली आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. कळमेश्वर** : – दिनांक ०८/२/२०२३ चे १५.३० वा. दरम्यान पो.स्टे. कळमेश्वर हद्दीत यातील फिर्यादीची पिडीत भाची हीला यातील फिर्यादी व त्याची पत्नी ही कळमेश्वर येथे भाजीपाला घेणे करीता आले असता यातील संशयीत आरोपी नामे– पप्पु नावाचा संशयीत ईसम याने पीडीत मुलीला तिचे अज्ञात पणाचा फायदा घेवुन फुस लावुन पळुन घेंवुन गेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मुडे पो.स्टे कळमेश्वर मो. नं. ९४०३९५१२३६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**